# भारतीय भाषा व साहित्याचा अभ्यास


## सारिका सचिन भोसले

स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर.


DOI: https://doi.org/10.5281/zenodo.18332937


**ABSTRACT:**

आज आपल्या भारतामध्ये साहित्य अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भाषांमधून लिहिले जाते. मात्र या लिहिण्याचे स्वरूप आणि जडणघडण हे मात्र एकात्म प्रकारचे आहे. कारण याचा मजबूत पाया आहे आणि तो पाया म्हणजे आपली भारतीय संस्कृती. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनी सन १९१८ मध्ये विश्वभारतीचा पाया घातला, त्याचा उद्देश होता 'वसुधैव कुटुंबकम्'. म्हणजेच भारत वर्षातील शिक्षण पद्धतीने वैदिक, पौराणिक, बौद्ध, जैन, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, पारसी इत्यादी सर्व विचार एकत्र आणले पाहिजेत. त्यानंतर साने गुरुजींच्या आंतरभारतीची संकल्पना निर्माण झाली. भारतीय साहित्यात प्राचीन काळापासून मिथक, चिंतन, मूल्य अशा तिन्ही अंगांनी समांतर अभिव्यक्ती होत आली आणि त्यामधूनच राष्ट्रीयतेचा, एकजुटीचा, एकात्मतेचा विचार पुढे आला. सर्वधर्मसमभाव, समानतेची आणि सहिष्णुतेची वृत्ती विकसित झाली. समाज सुधारणेच्या कामाबरोबरच सामाजिक परिवर्तनाचे कार्यसुद्धा साहित्याने मोठ्या प्रमाणावर केले. भाषा ही समाजातील अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. भाषेच्या स्थित्यंतरावरून समाजाची स्थित्यंतरे लक्षात येतात. आज जागतिकीकरणानंतर आणि माहिती तंत्रज्ञान साधनाच्या विकासयुगात जग जवळ आले आहे. आज या विज्ञान युगात मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले आहे. आता त्याची नजर मंगळावर आहे. या प्रचंड ब्रम्हांडात आपल्यासारखाच माणूस कोठे आहे काय, याचा शोध घेत आहे. पण हे सारे करताना आपल्या समोरच्या माणसाला मात्र तो विसरत चालला आहे. त्याने निर्माण केलेल्या कला, भाषा, साहित्याचा विसर पडत आहे, दुर्लक्ष होत आहे. म्हणून आपली संस्कृती आणि भाषा जपणे आपले कर्तव्य आहे.



**KEYWORDS:**

भारतीय साहित्य, राष्ट्रीय एकात्मता, भारतीय संस्कृती, सामाजिक परिवर्तन, भाषिक विविधता.

**प्रस्तावना:**

'लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालवलेले राज्य' अशी अब्राहम लिंकन यांची व्याख्या सार्थ करणारा भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. अनेक वेगवेगळया प्रकारच्या भाषा, धर्म, रुढी, परंपरा, जाती, लिपी आणि वेगवेगळया संस्कृती यामुळे भारत बहुवंशीय आणि बहुसांस्कृतिक म्हणून राहिला आहे. 'भारतवर्ष' हे आपल्या भारताचे प्राचीन नाव. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 'हिंदुस्तान' तर विदेशामध्ये 'इंडिया' या नावाने ओळखला जातो. अनेक नावे जरी असली तरी सर्वधर्मसमभाव याप्रमाणे भारत हा जगातील सगळयात मोठा लोकशाहीने चालणारा असा देश आहे. घटनेच्या ८ व्या परिशिष्टानुसार २२ भाषांना राजभाषेचा दर्जा देण्यात आला आहे. देशात आतापर्यंत अकरा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. तमिळ भाषेला सर्वात आधी २००४ साली अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला. त्यापाठोपाठ संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलगू (२००८), मल्याळम (२०१४), मराठी, प्राकृत, पाली, आसामी, बंगाली (२०२४) या भाषांना अभिजात दर्जा बहाल केला आहे. आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोंकणी, मैथिली, मल्ल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगु, उर्दू या मान्य राजभाषा आहेत. आणि भारतामध्ये बोलल्या जाणाऱ्या व त्यांचे साहित्य असणाऱ्या वेगवेगळया भाषेमधील बंगाली, मराठी, हिंदी या राजभाषेच्या साहित्यांचा थोडक्यात परिचय करून देण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**उद्दिष्टे:**

1. साहित्य म्हणजे रत्नांची खाण, त्याचे काळजीपूर्वक जतन करणे, संरक्षण व संवर्धन करणे.
2. राष्ट्रीय एकात्मतेच्या आचार-विचारांना बळकटी देणे.
3. परिवर्तन हे सर्वगामी प्रगतीसाठीचे आवश्यक पाऊल आहे, त्यादृष्टीने प्रयत्न करणे.
4. समान जीवनमूल्ये, जीवनशैली, सांस्कृतिक ओळख यांची ओळख करून देणे.
5. नवा वाचक प्रगल्भ करून त्यातून जबाबदार, कर्तव्यदक्ष, कार्यसंस्कृतीने युक्त नागरिक घडविणे हे नव्या भारतीय साहित्याचे ध्येय असावे.
6. समांतर एकात्मतेतूनच भारतामध्ये वेळोवेळी विविधतेतून एकता

निर्माण करणे.

साहित्य हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरला जातो. परंपरेने आपण पाहिले तर साहित्य म्हणजे काव्य, नाट्य, कथा, कादंबरी इत्यादी सर्वांचा समावेश असणारी एक प्रकारची वाङ्मय शाखा. साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थाचा मेळ. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब. जो लिहिणारा साहित्यिक असतो, तो आपल्या अनुभवातून, निरीक्षणातून उतरवत असतो आणि म्हणून साहित्य लेखनाचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा आहे. पूर्वीच्या काळी आपले साहित्य मौखिक स्वरूपाचे होते म्हणून आपण त्याला वाङ्मय म्हणतो आणि त्यानंतर उदयाला आली लिखिताची परंपरा. या परंपरेच्या माध्यमातून साहित्याचे अनेक प्रकार अस्तित्वात आले. आजच्या काळात विचार केला तर गद्य आणि पद्य दोन्ही प्रकार आहेत. कविता, गीत, गझल, अभंग, गवळण, सुनीत, खंडकाव्य, महाकाव्य अशा अनेक प्रकारे काव्याची रचना केली जाते. शब्द साहित्यामध्ये पण कथा, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र, आत्मकथन, आठवणी, प्रवासवर्णन, पत्र, वृत्तांत, श्रुतिका इत्यादींचा समावेश होतो.

आपल्या भारताचे राष्ट्रगीत बंगालीमध्ये आहे. भारतीय भाषांमध्ये समृद्ध साहित्य परंपरा बंगालमध्ये आहे. दोन राष्ट्रांचे राष्ट्रगीत रचण्याचा सन्मान व गौरव लाभलेली भाषा आहे. भारताला लाभलेले साहित्याचे एकमात्र नोबेल पारितोषिक याच भाषेने मिळवून दिले आहे. बंगाली भाषा ही जगातील ७ व्या क्रमांकाची भाषा आहे. भाषिक अस्मितेवर उदयाला आलेले एकमेव राष्ट्र, कारण पुस्तकांच्या दुकानात रेशनसारख्या रांगा या इथेच बघायला मिळतात. बंगाली माणूस घरीदारी, जळीस्थळी बंगाली जपतो. म्हणून बंगाली साहित्याच्या पुस्तकांची आवृत्ती सरासरी ५००० च्या घरात असते. कोलकत्याला जाण्याचा योग आला तर तेथील विद्यापीठ भारतातले एकमेव विद्यापीठ आहे की, त्याचे कंपाऊंड पुस्तकाच्या टपऱ्यांनी वेढलेले आहे (पान नं २३ - भारतीय भाषा व साहित्य, डॉ. सुनीलकुमार लवटे). बंगाली समाजात भाषा, साहित्य, संस्कृती, वाचन, रांगोळी, भजन (रवींद्र संगीत) यांना जीवापाड जपले आहे. कारण विष्णू डे, सुभाष मुखोपाध्याय, आशापूर्णा देवी, महाश्वेता देवी, तस्लिमा नसरीन असे जग बदलणारे साहित्यिक तिथे जन्मले आहेत. रवींद्रनाथ टागोर हे आधुनिक बंगालीचे समग्र साहित्यिक, त्यांच्या 'गीतांजली'ला नोबेल पारितोषिक मिळाले. काबुलीवाला, शांतिनिकेतन, चोखेर बाली यासारख्या साहित्याने क्रांती घडवून आणली. तसेच शरतचंद्र चतर्जी यांनी देवदास, परिणीता, श्रीकांत, चारित्रहीन या कादंबऱ्यांनी अशी मोहिनी घातली आहे की, चित्रपटसृष्टीमध्ये या

कादंबऱ्यांवर अनेक जुन्या व नव्या कलाकारांनी काम करून त्यावर आधारित चित्रपट गाजवले आहेत आणि रसिक मनावर आजही राज्य करत आहेत.

1. ले ज्ञानपीठ विजेते - ताराशंकर बंडोपाध्याय - १०८ साहित्यकृती ('गणदेवता' कादंबरीस पुरस्कार).
2. रे ज्ञानपीठ विजेते - विष्णू डे - ४० साहित्यकृती – ('स्मृती सत्ता भविष्यत' काव्यसंग्रह पुरस्कार).
3. रे ज्ञानपीठ विजेते – आशापूर्णा देवी - ११३ कादंबरी, २३ कथासंग्रह ('प्रथम प्रतिश्रुति' कादंबरीस पुरस्कार).

बांगलादेशाची तस्लिमा नसरीन हिने आपल्या कादंबऱ्या व आत्मकथनातून स्त्रीचे धगधगते व ठसठसणारे दुःख वेशीवर टांगत २१ वे शतक स्त्री-पुरुष समानतेचे हवे, हे सांगण्याखातर देश सोडला पण तिची लेखणी मोडली नाही. जणू काही 'आमार सोनार बांगला देश' हे वर्णन सार्थ ठरविले.

हिंदीचा विकास म्हणजे सर्व साहित्यप्रकारांचा संभार! कथा, कादंबरी, नाटक, निबंध, एकांकिका, चरित्र, आत्मकथा, आठवणी, भाषणे, श्रुतिका, वृत्तांत सारे काही हिंदीत आढळते. १३०० वर्षाचा लिखित इतिहास या भाषेला लाभला आहे. भारतीय संविधानानुसार संपर्कभाषा म्हणून लाभलेली, माध्यमभाषा, व्यवहारभाषा, संवादभाषा इत्यादी विविध भूमिका बजावत भारतीयांच्या मनावर खऱ्या अर्थाने राज्य करणारी भाषा कुठली, तर ती 'हिंदी भाषा'. कुठलीही भाषा बोलणारा भारतीय असो, तो गाणे गुणगुणार हिंदीतून. एखाद्यासमोर आपल्या मनातील व्यक्तिगत प्रेमभाव व्यक्त करायचे असेल, तर तो हिंदी चित्रपटातील गाणी आठवतो. भिन्न भाषिक संवादाचे माध्यम म्हणून बाजार, प्रवास, पर्यटन, देशांतर फिरण्यासाठी हिंदीचाच वापर करतो. भारताच्या जवळजवळ सर्वच भागात बोलली जाणारी, समजणारी, अभ्यासली जाणारी भाषा म्हणून हिंदीचे राष्ट्रीय महत्त्व आहे. लोकव्यवहाराच्या मध्ये हिंदी हीच देशाची राष्ट्रभाषा आहे.

भारतीय भाषा व साहित्य या पुस्तकात डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणतात, "हिंदी साहित्याचा प्रारंभ वीरगाथांनी झाला. नंतर अनेक धर्म, विचार, संप्रदाय नि विविध भक्तीमार्गाचे विपुल साहित्य हिंदीत लिहिले गेले. नाथसिद्ध, जैन, बौद्ध साहित्याशिवाय सगुण, निर्गुण, सुफी साहित्य काव्यरूपात आढळते. राम व कृष्णभक्तीची मोठी काव्य परंपरा

हिंदीत आहे. कबीरदास, तुलसीदास, सूरदास, मीराबाई, नामदेव, नानक अशी भक्तीरचनांची मोठी परंपरा हिंदी प्राचीन काव्यात आहे." हिंदीतील पहिले महाकाव्य 'प्रिय प्रवास' अयोध्यासिंह उपाध्याय (हरिऔध) हे आहे. जयशंकर प्रसाद, सुमित्रानंदन, सूर्यकांत त्रिपाठी, महादेवी वर्मा या कवींनी हिंदी काव्यात भावनात्मकता आणली. अज्ञेय, नरेश मेहता, कुँवर नारायण, केदारनाथ सिंह यांना भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. प्रेमचंदाच्या कथा-कादंबऱ्या हेच हिंदी साहित्याचे खरे वैभव आहे. प्रेमचंदाच्या सर्व कथा वाचकांसाठी उपलब्ध आहेत. हिंदी कादंबरीतील 'गोदान' ही प्रेमचंदांची सर्वश्रेष्ठ व अमर कादंबरी आहे, की त्यामध्ये भारतीय शेतकऱ्याच्या जीवनाचे चित्रण आहे. हिंदी साहित्यात हरिवंशराय बच्चन यांचेही नाव आदराचे आहे. त्यांच्या मधुशाला, मधुबाला आणि मधुकलश या हिंदी कवितांचे प्रत्येकाच्या हृदयात वरचे स्थान आहे. 'कलम का सिपाही, आत्मनेपद, सिंहावलोकन' ही आत्मचरित्रे आहेत. जागतिकीकरणानंतरच्या काळात शिवमूर्ती, संजीव, प्रियंवद, सृंजय, उदय प्रकाश, नासिरा शर्मा अशी अनेक नावे आहेत की ज्यांनी उत्तम हिंदी साहित्य लेखन केले. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा असावी ही महात्मा गांधीच्या इच्छेबरोबर साने गुरुजीच्या मनातही तेच होते. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रभाषा बनवताना उत्तर भारत व दक्षिण भारत लक्षात घेऊन हिंदी हीच सर्वतोपरीने राजभाषा म्हणून निवडण्यात आली. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांचा पाठीमागचा प्रवास पाहता हिंदी ही उपयुक्त आणि व्यवहाराची भाषा ठरली आहे. आपल्या देशाची सर्वोच्च सभा, केंद्र शासनाचा पत्रव्यवहार, देशोदेशी असणारे राजदूत यांच्या संपर्कासाठी हिंदी भाषा ही उपयोगाची ठरते. म्हणून जगात हिंदी हीच भारताची भाषा म्हणून मान्यता पावली आहे. जगातील १२५ देशांतील विद्यापीठात भारतीय भाषा म्हणून हिंदी शिकवतात. भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांचा विचार केला तर हिंदीमध्ये अकरा हिंदी साहित्यिकांना हा पुरस्कार मिळाला आहे. आज मराठी असो, मल्याळम असो की तेलगु, सर्व साहित्यकृतीचा हिंदी अनुवाद उपलब्ध आहे. म्हणून भारताचे हृदय सिंहासन म्हणून हिंदी भाषेचा मान आहे.

कोणतीही भाषा वा साहित्य यांच्या श्रेष्ठत्वाची आणि तिचे मृत्युंजयी वा चिरंतन होणे याची एकमात्र कसोटी असते, ती ही की ती भाषा समकाल कशी येते? या निकषावर मराठी ही निरंतर, विविधपूर्ण व विकसित होत जाणारी भाषा असल्याचे जाणवते. त्यामुळे तिचे साहित्यही नित्य आधुनिक होताना दिसते आणि म्हणूनच वर्तमान भारतीय

भाषांमध्ये आज तिचा अभिजात मराठी भाषा आणि अत्याधुनिक भाषा म्हणून तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. स्वतंत्र राज्य वा प्रांत म्हणून ओळख असणाऱ्या महाराष्ट्राची मराठी भाषा आहे. भारतीय भाषांमध्ये मराठीचे स्थान हिंदी, बंगाली, तेलुगु नंतर आहे. मराठी भाषेचा उगम संस्कृत-प्राकृत भाषेतून झाल्याचे मानले जाते. मराठी भाषेचा इतिहास सुमारे हजार वर्षांपेक्षा जास्त जुना आहे. ही इंडो-आर्यन भाषा समूहातील एक प्राचीन भाषा आहे. मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा आणि ती महाराष्ट्रासह जगभरातील मराठी भाषिक लोकांच्या हृदयात वसलेली आहे. मराठी लिखिताची आद्यरूपे, ताम्रपट, कोरीव लेख अशा स्वरुपात आढळतात. कर्नाटकामधील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वर मूर्तीच्या पायथ्याशी कोरलेला मजकूर 'श्री चामुण्डेराजे करवियले' हे मराठीचे आद्यलिखित मानले जाते. मुकुंदराज यांचे विवेकसिंधू (इ.स.११८८), म्हाइमभट यांचे 'लीळाचरित्र' (इ.स.१२७८), साती ग्रंथ, महानुभाव वाङ्मय, संत काव्य यांतून आधुनिक मराठी साहित्य विकसित झालेले दिसते. संत काव्याचा विचार केला तर संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, रामदास, चोखोबा, नरहरी सोनार यांचा उल्लेख होतो, पण संत काव्याचे वैशिष्ट्य आहे की यात सर्व जाती-धर्माच्या संतांचे साहित्य पहावयास मिळते. एकनाथी भागवत, तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, संत रामदास यांचा दासबोध यामुळे मराठी साहित्याला नवी झळाळी मिळाली. 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' किंवा 'मराठीचे बोलु कौतुके, अमृतातेहि पैजा जिंके' असा सुवर्णकाळ मराठीला लाभला. मराठी गद्य साहित्यप्रकार पहायचा म्हटला तर बखर वाङ्मयाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. शालिवाहनाची बखर सर्वाधिक प्राचीन मानली जाते. रामचंद्रपंत अमात्यांचे 'आज्ञापत्र' हेही उत्तम उदाहरण आहे. आधुनिक मराठी साहित्याचा कालखंड सन १९१८ पासून मानतात. त्यात केशवसुत महत्त्वाचे कवी, त्यांच्याबरोबर प्रभावाने ना. वा. टिळक, बालकवी, गोविंदाग्रज आदींची नावे येतात. मराठी काव्य आधुनिकतेकडे आणखी नेण्यामध्ये माधव ज्युलियन, गं. त्र्यं. माडखोलकर, यशवंत, गिरीश इत्यादी प्रमुख होते. स्वातंत्र्यानंतरचे कवी म्हणून बा. सी. मर्ढेकर, विं. दा. करंदीकर, वसंत बापट, ना. धो. महानोर ओळखले जातात. यामध्ये दलित काव्यानेही वास्तवाची भूमिका मांडली; नामदेव ढसाळ, दया पवार, अरुण कांबळे यांनी मराठीला नवीन बाज दिला. मराठी साहित्याला नाटकांचीही वेगळीच परंपरा लाभली आहे. विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, गो. ब. देवल, रा. ग. गडकरी या नाटककारांनी संगीत सौभद्र, संगीत मानापमान,

एकच प्याला, शारदा, पुरुष, कमला, लग्नाची बेडी, घाशीराम कोतवाल अशा अनेक नाटकांतून मराठी संस्कृतीचे दर्शन घडविले. एकोणिसाव्या शतकामध्ये मराठी कादंबरी उदयाला आली. 'यमुनापर्यटन' (१८५७) बाबा पदमनजी, 'हिंदू' (२०१५) भालचंद्र नेमाडे, 'पण लक्षात कोण घेतो' (१८९३) हरिभाऊ आपटे, वि. स. खांडेकर 'ययाति' (१९६२) अशा अनेक कादंबऱ्यांनी वाचकांना वेडे केले. आत्मकथनाचा विचार केला तर आनंद यादव (झोंबी), दया पवार (बलुतं) ही वेदनादायी, वास्तव मांडणारी आहेत. नंतरच्या काळात मराठी कथेचे क्षेत्रही विकसित झाले. बाबुराव बागुल, रा. र. बोराडे, द. मा. मिरासदार, अण्णा भाऊ साठे यांनी विविध कथांमधून मराठी भाषेचे मराठीपण जपले. मराठीमध्ये बालसाहित्याची वेगळीच परंपरा आहे. साने गुरुजी, मा. रा. भागवत, सुधाकर प्रभू, गिरिजा कीर यांनी मराठी बालसाहित्य लिहिले. मराठी विश्वकोश हा भारतीय भाषांतील सर्वश्रेष्ठ कोश मानला जातो. १ ले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी कादंबऱ्यापासून ते पटकथासंग्रह मिळून १५० कथांचे लिखाण केले, म्हणून तर त्यांचे नाव आदराने घेतात. त्यानंतर दुसरे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. वा. शिरवाडकर यांनी मराठी कविता, निसर्ग आणि मानवी जीवनाचा नवीन शोध घेण्याच्या दृष्टीने लेखन केले. 'जीवनलहरी' (१९३३) ते 'मुक्तायन' (१९८४) त्यांचा काळ अनमोल आहे. 'नटसम्राट' (१९७१) नाटक वर्तमानातील वृद्धांचे चित्रण करते. मराठीतील आणखी एक श्रेष्ठ साहित्यिक विं. दा. करंदीकर हे २००३ च्या ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी ठरले. त्यांच्या लेखनातून महादेशाच्या सांस्कृतिक परिवर्तनाचे चित्रण आहे. हिंदू जगण्याची समृद्धी, अडगळ बिढार, कोसला, झूल आणि हूल यांतून डॉ. नेमाडे यांचे वेगळेपण दिसून येते, म्हणून मराठीचा गौरव केला आहे.

**समारोप:**

भारतीय भाषा प्रकार भरपूर आहेत कारण भारतात वेगवेगळया राज्यात, राज्यातील वेगवेगळया ठिकाणी विविध भाषा बोलल्या जातात आणि त्यातून साहित्य निर्माण होते. पूर्वीच्या काळापेक्षा आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात आपल्याला घरबसल्या कुठल्याही साहित्यिकाची माहिती, साहित्य इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध होते. आसामी, बंगाली, बोडो, हिंदी, गुजराती यापेक्षा अधिक समृद्ध भाषा आहेत आणि त्यांचे साहित्यही आहे. या सगळया भाषा या परस्परांशी संलग्नित आहेत. भारतासारख्या देशात सर्वधर्मसमभाव याप्रमाणे या भाषा बोलल्या

जातात आणि त्या भागातील संस्कृती जतन केल्या जातात. म्हणून विविध भाषेतील साहित्य आपण सांस्कृतिक वारसा याप्रमाणे जतन आणि संवर्धन करून ठेवले पाहिजे आणि हे प्रत्येक भारतीय नागरिकाने आपले कर्तव्य मानले पाहिजे.

**निष्कर्ष:**

1. प्राचीन साहित्याचा इतिहास जाणून घेण्यासाठी विविध भाषांतील साहित्याचा बारकाईने अभ्यास केला जातो.
2. विविध भाषांमधील साहित्यामुळे भारतातील वेगवेगळया प्रकारच्या साहित्याचा परिचय होतो आणि नवनवीन माहिती मिळते.
3. सर्वधर्मसमभाव, सांस्कृतिक मूल्ये जोपासण्यासाठी मदत होते.
4. भारतातील विविध भाषा साहित्यामुळे राष्ट्रीय भावना, सांस्कृतिक ओळख, जीवनशैली या विविधतेचे दर्शन घडते.
5. भारतीय भाषेची, साहित्याची नव्या शतकातील युवा पिढीला ओळख होईल.

## संदर्भसूची:

1. केशव मेश्राम - साहित्य संस्कृती मंथन, प्रथमावृत्ती ऑगस्ट २००४, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
2. डॉ. सुनीलकुमार लवटे - भारतीय भाषा व साहित्य, प्रथमावृत्ती २ ऑक्टोबर २०१७, साधना प्रकाशन.
3. म. सु. पाटील - साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध, प्रथमावृत्ती जुलै २००१, शब्दालय प्रकाशन.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.